## पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम (प्रचार व प्रसिध्दी)

## सन २०१७-१८ साठी मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना –**

राज्यातील बहूतांशी क्षेत्र कोरडवाहू असून उपलब्ध जलस्त्रोताचा उपयोग तसेच पर्जन्याधारीत क्षेत्रातील उत्पनाचे सातत्य टिकविण्यासाठी नैसर्गीक साधन संपत्तीचे जतन करणे, संरक्षित जलसिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबविणे, पडीक जमिनीचा विकास करुन ग्रामिण भागातील उत्पन्न व उत्पादनाची साधने वाढविणे, विविध उपचारांद्वारे पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत विविध उपचारांनी बळकट करणे आणि भूगर्भातील पाणी काटकसरीने व आवश्यकतेनूसार उपयोगात आणणे या सर्व उपचारांनी राज्यात मृद व जलसंधारणाचा कार्यक्रम विविध राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राबविण्यात येतो.

महाराष्ट्र राज्यात पिकाच्या ऐन वाढीच्या काळात पावसाची अनियमीतता व पावसातील खंड यामुळे सतत टंचाई सदृश्य परिस्थीती निर्माण होऊन त्याच्या मोठा परिणाम कृषि क्षेत्रावर होत आहे. राज्यात जवळजवळ ८२ % क्षेत्र कोरडवाहू व ५२ % क्षेत्र अवर्षण प्रवण आहे. महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र जलअ-२०१४/प्र.क्र२०३/जल-७ दि. ५ डिसेंबर २०१४ अन्वये ‘‘सर्वासाठी पाणी-टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९’’ करण्यासाठी व टचांई परिस्थीतीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबध्दरित्या कृति आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी ‘‘जलयुक्त शिवार अभियान’’ राबविण्याचे ठरविलेले आहे.

पाणलोट विकास चळवळ कार्यक्रमातंर्गत देण्यात येणाऱ्या निधीतून जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी खर्च करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

**सन २०१७-१८ चा प्रस्ताव –**

पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम सन २०१७-१८ चा रु. ७००.०० लक्ष निधीचा प्रस्ताव शासनास या कार्यालयाचे पत्र क्र मृद-१/पाविचका/२०१७-१८/६७९ दि. १७/०४/२०१७ रोजी सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावातील जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रचार प्रसिध्दी या बाबीस मान्यता दिलेली आहे.

यापैकी जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रचार प्रसिध्दीसाठी खालील प्रमाणे निधी उपलब्ध झालेला आहे.

जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयास (मुंबई व मुंबई उपनगर वगळून) रुपये ५.०० लक्ष निधी शासन निर्णय क्र पाविच-२०१७/प्र.क्र४८/ जल-८ दि. २१/०७/२०१७ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सदर निधी आयुक्तालयाने दि १६/०८/२०१७ रोजी अर्थसंकल्पीत वितरीत प्रणाली (बी.डी.एस) द्वारे विभागांना / जिल्हयांना वितरीत केलेला आहे.

शासन निर्णयामध्ये नमूद केलेनूसार सदर निधीतून जलयुक्त शिवार अभियानासाठी जिल्हा स्तरावर कार्यशाळा, भिंती पत्रके, सरंपच मेळावे, पथनाटय, चित्रफीत, घडीपत्रिका, कृषि दिंडी इं. उपक्रमांवर आवश्यकतेनूसार प्रचार व प्रसिध्दीसाठी खर्च करावा. निधीचा विनीयोग करताना वित्त विभागाने वेळोवळी विहीत करुन दिलेल्या लेखापध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

**योजनेचे लेखाशिर्ष –** ‘‘मागणी क्र.एल-७,४४०२-मृद व जलसंधारण यावरील
भांडवली खर्च, १०२ मृदसंधारण (०१) राज्य योजना
पंचवार्षिक योजनातंर्गत योजना
(०१)(२१) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमख प्रसिध्दी व
पारितोषीक योजना (४४०२ २३५१) २६ जाहिरात व प्रसिध्दी.

**योजनेबाबत प्रगती अहवाल :**

योजनेबाबतचा मासिक प्रगती अहवाल तसेच बाब निहाय खर्चाचा अहवाल सोबत दिलेल्या प्रपत्रात दरमहा सादर करण्यात यावा. तसेच उपयोगीता प्रमाणपत्र वेळेत सादर करण्यात यावे.

**महत्वाची सूचना :** वरील समाविष्ट घटक / बाबींच्या बाबत शासन निर्णया शिवाय जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने परस्पर निर्णय घेऊ नये. सदर योजनेतील समाविष्ट घटक / बाबी आपणांस पुर्वनियोजनासाठी कळविण्यात येत आहेत. उपरोक्त शासन निर्णय व्यतिरीक्त इतर घटक / बाबींसाठी शासन निर्णय निर्गमित होताच स्वतंत्र सूचना देण्यात येतील.

सहपत्रीत करण्यात आलेल्या तक्त्यामध्ये निधी खर्चाची माहिती देण्यात यावी.

----------------------------------------------------------------------------------

जा.क्र.मृदसं/पाविच/मृद-१/१७५९/१७
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
दिनांक - १९/०९/२०१७.

प्रति,

१) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

**पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम (प्रचार व प्रसिध्दी)**

**सन २०१७-१८  निधी खर्चाची माहिती**

**मासिक प्रगती अहवाल**

**जिल्हा:-** **रु.(लाख)**

| अ.क्र. | वितरीत निधी | बाब निहाय झालेला खर्च | | | एकुण खर्च | शिल्लक निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |